पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ६

**सभावृत्तांत**

दिनांक - **०४/०७/२०१७** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **०४/०७/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सुनिता हेमंत तापकीर - सभापती**
२. मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे - उपसभापती
३. मा.आंगोळकर सागर सुनिल
४. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
५. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे
६. मा.लोखंडे चंदा राजू
७. मा.सुलक्षणा राजू धर
८. मा.कदम निकीता अर्जुन
९. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.आष्टीकर – सहा.आयुक्त, मा.इंदलकर - नगरसचिव, मा.पाटील – प्राचार्य आयटीआय, मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे – सहा.प्रकल्प अधिकारी, मा.जरांडे – मुख्य सुरक्षा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्य यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) महिला बचत गटातील व इतर महिलांना व्यवसाय प्रशिक्षण उपलब्ध करुन देणेबाबत – मा.योगिता नागरगोजे, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) सन २०१७-१८ या कालावधीत " महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम " ही योजना वस्तीपातळीवर राबविणेबाबत – मा.सोनाली गव्हाणे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक २०/०६/२०१७ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ०५)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामाकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ०८ विषय क्रमांक - ०१

दिनांक - ०४/०७/२०१७

सुचक : मा.योगिता नागरगोजे अनुमोदक : मा.सागर आंगोळकर

संदर्भ : मा.योगिता नागरगोजे, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव –

विषय – महिला बचत गटातील इतर महिलांना व्यवसाय प्रशिक्षण उपलब्ध करुन देणेबाबत –

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ०९ विषय क्रमांक - ०२

दिनांक - ०४/०७/२०१७

सुचक : मा.सोनाली गव्हाणे अनुमोदक : मा.योगिता नागरगोजे

संदर्भ : मा.सोनाली गव्हाणे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव –

महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत सन २०१७-१८ या कालावधीत महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम ही योजना वस्तीपातळीवर राबविणेकामी महिला व बालकल्याण समिती सभा ठराव क्र. ४ दि. ०६/०६/२०१७ नुसार धोरणास व मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ५५३ दि. २१/०६/२०१७ नुसार महिला व बालकल्याण समिती सभेने मान्य केलेल्या धोरणास अनुसरुन योजना अंमलबजावणी विषयक इतर बाबींस व सदर योजनेअंतर्गत होणा-या प्रशिक्षणासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता दिलेली आहे.

मा. महापालिका सभा ठराव क्र. ९९८ दि. २०/०९/२०१० नुसार "मा. महिला व बालकल्याण समितीने महापालिका क्षेत्रातील महिला, बालके यांच्या विकासाकरीता राबवावयाच्या योजना तयार करणे, योजनेच्या लाभार्थी विषयक अटी व शर्ती ठरवून अशा योजनांच्या मसूद्यास अंतिमरित्या मान्यता देणे, मुळ योजनेच्या मसुद्यात कालानुरुप बदल करणे, एखादी कालबाह्य योजना बंद करणे, एखादी नविन योजना सुरु करण्यास मान्यता देणे." यासंबंधीत महापालिका सभेचे अधिकार मा. महिला व बालकल्याण समितीस प्रत्यायोजित केले असल्याने त्यानुसार अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार मा. महिला व बालकल्याण समिती सभा यांचे ठरावातील धोरणात्मक

मान्यतेनुसार व मा. स्थायी समितीने सदर योजनेवर होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता दिलेनुसार सदरची योजना मनपा स्तरावर राबविणे क्रमप्राप्त आहे.

महिलांच्या ज्ञान कौशल्यात वाढ व्हावी या उद्देशाने सदर योजनेचे आयोजन करणेत येते. तसेच विषयानुरुप अभ्यासक्रम पाहुनच व तो आपल्याला झेपेल याची खात्री वाटणा-या म्हणजेच तो कोर्स करण्याचे ज्ञान/कुवत/क्षमता असलेल्या गरजू महिलाच सहभाग शुल्क भरुन प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी फाईल सादर करीत असतात. त्यामुळे विशिष्ट अशा शैक्षणिक अर्हतेच्या अटीची आवश्यकता नाही. विशिष्ट शैक्षणिक अर्हते अभावी महिलांना त्यांचे इच्छेनुरुप ज्ञान कौशल्य कार्यक्रमास सहभागी होणेपासुन वंचित ठेवले अथवा ते वंचित राहिले असे होणार नाही, केवळ शैक्षणिक अर्हतेतुन ज्ञानाची पातळी कळुन येत नाही. त्यामुळे कुठलीही गरजु/इच्छुक महिला ज्ञान कौशल्य कार्यक्रमापासुन वंचित राहु नये, कार्यक्रमात सहभागी करुन घेत नाही अशा कुठल्याही प्रकारच्या तक्रारीस वाव राहु नये, या हेतुने कुठलीही/विशिष्ट शैक्षणिक अर्हता न ठेवता सर्व इच्छुक साक्षर महिलांना ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रमात सहभागी होण्यास मान्यता देणेत येत आहे. तथापि, ठरावानुसार मान्य विषयांचे प्रशिक्षण हे लाभार्थ्यांच्या मागणीनुसार सर्व मनपा स्तरावर देण्याचे संस्थेला बंधनकारक करणेस तसेच सदरचे प्रशिक्षण हे गुणात्मक व दर्जात्मक होणे गरजेचे असल्याने संस्थेने निश्चीत केलेल्या अटी व शर्तीत बसणा-या महिलांची प्रशिक्षक पदी नेमणूकीसाठी म्हणुन सदर योजनेअंतर्गत कोर्स पुर्ण केलेल्या महिलेला रोजगार मिळावा म्हणुन आणि त्या महिलेची मागणी असेलतर त्या महिलेस प्राधान्य देणेत यावे. मा. म. व बा. समिती सभा ठराव क्र. ४ दि.०६/०६/२०१७ मधील कंसातील सर्व करांसहित हा शब्द वगळुन त्या ऐवजी जी.एस.टी. लागु असेल तर जी.एस.टी. वेगळा देण्यात यावा अशी दुरुस्ती करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अल्प कालावधीत मोठ्या प्रमाणावरील प्रशिक्षणाचे कामकाज वस्तीपातळीवर संस्थेला राबवावे लागणार आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ निर्मिती व प्रशिक्षणाच्या अनुषंगाने साहित्य सामुग्री उपलब्ध करणे, इत्यादी कामी त्यांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक गुंतवणूक करावी लागणार आहे. सदरचे प्रशिक्षण हे वस्तीपातळीवर राबवावयाचे असल्याने तसेच ते सध्या अस्तीत्वात असलेल्या सहाही क्षेत्रिय कार्यालयाच्या हद्दीत थोड्या फार फरकाने एकाच वेळी राबविणे अनिवार्य असल्याने प्रत्येक प्रशिक्षण वर्गाच्या ठिकाणी थंम्ब इंप्रेशन मशीन बसविणे संस्थेला शक्य होणार नाही. अथवा तशी मागणी करणे व्यवहार्य होणार नाही. मात्र प्रशिक्षणाच्या बाबत कुठल्याही शंकेला वाव राहू नये या हेतुने मनपामार्फत निश्चीत केलेल्या अधिकारी/कर्मचा-यांमार्फत प्रत्येक प्रशिक्षण वर्गास किमान दोनदा आकस्मिक भेट देऊन अहवाल सादर करणे बंधनकारक करावे व त्यांच्या योग्य त्या अहवालानुसारच संस्थेस ठरलेली प्रशिक्षण शुल्काची रक्कम अदा करणेत यावी. याप्रमाणे दुरुस्तीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सुनिता हेमंत तापकीर )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/९६८/२०१७
दिनांक : १४/०७/२०१७

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.